
जो लोग गिरने से डरते हैं वह कभी भी जीवन में उड़ान नहीं भर सकते।


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १६ फेब्रुवारी २०२५ | अंक ७० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# करमाळ्यातील शेतर्कयाने, शेतीत अभिनव प्रयोग केला हिरव्या पावडरची भुरळ सातासमुद्रापार

## महादेव मोरे या शेतर्कयाने तब्बल साडेसात एकरावर शेवगा पावडर ते हवाबंद ड्रम मध्ये २५ किलो प्रमाणे त्यातून त्यांनी लाखो रुपये कमावलेले आहे

### युट्यूब आले मदतीला

शेवग्याच्या शेंगा चर्चेत असल्या तरी शेवग्याचा पाला कधीही चर्चेत नव्हता. पण त्याची पावडर करून विकण्याची कल्पना त्यांना गुजरात मधील शेवगा शेती युट्यूबवर पाहिल्यानंतर सुचली. सुरुवातीला एक ते दीड एकरात शेवग्याच्या पालाचा पावडर प्रयोग केला. देशात कोलकत्ता, हैदराबाद, नागपूर, मुंबई आणि पुणे येथे पाव किलो पासून दोन किलो पर्यंत शेवगा पाल्याची पावडर विक्री केली जाते. शेवगा पाला पावडर उत्पादन एकरी ४ ते ५ टन पहिल्या वर्षी निघाले. सदर प्लॉट ८ ते १० वर्षे चालतो. ८ ते १० दिवसांतून एकदा पाणी द्यावे लागते.

शेवग्याच्या शेंगा विकून मालामाल होणारे शेतकरी आपण पाहिलेले आहेत परंतु शेवगा शेतीतून पाला व त्यापासून पावडर तयार करून थेट अमेरिकेत निर्यात करण्याचा विक्रम करमाळा तालुक्यातील साडे येथील युवा शेतर्कयांनी नोंदवला आहे. अशा प्रकारचा अभिनव प्रयोग करून त्यांनी राज्यातील शेतक-यांसमोर एक नवीन आदर्श ठेवला आहे. पारंपारिक शेतीसोबतच त्यांनी ही वेगळी वहिवाट निवडली आणि त्यातून त्यांना चांगली कमाई होत आहे.

शेवग्यातून लाखोंची कमाई

महादेव मोरे या शेतर्कयाने तब्बल साडेसात



एकरावर शेवगा शेती केली आहे. शेवग्याच्या पालापासून पावडर करून ते हवाबंद ड्रम मध्ये २५ किलो प्रमाणे भरून अमेरिकेला पाठवत आहेत. त्यातून त्यांनी लाखो रुपये कमावलेले आहेत. सुरुवातीस दुष्काळामध्ये एक एकर शेवगाची शेती मोरेंनी केली होती. कोरोनामध्ये शेवग्याची शेती नुकसानीत गेली, त्यातून झालेला खर्च सुद्धा निघाला नाही. त्यानंतर शेवग्याच्या शेंगांना विकता शेवग्याच्या पालाची पावडर करून विक्री करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. शेवगा आरोग्यासाठी सर्वोत्तम

बीपी, शुगर सह ३०० आजारावर शेवगा हे गुणकारी औषध आहे. शेवगा हा शुगर बीपीसह ३०० प्लस आजारावर गुणकारी औषध आहे. मुतखडा आणि मुळव्याध हे या रोगावर शेवग्याची मात्रा लागू पडते. सर्वच रोगांवर शेवगा गुणकारी आहे. शेवगा पाला, मुरिंगा पावडर औषधीसाठी उपयोगात आणली जाते.

कुठल्याही प्रकारचे रासायनिक खत न वापरता गांडूळ खत व शेणखत त्याशिवाय शेवग्याच्या पालापासून तयार झालेली लिक्विड म्हणून द्यावी लागते. शेवगावर रोगराई नसल्याने फवारणी करण्याची गरज नाही. या शेतीसाठी ७० हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. या शेतीमधून चार ते पाच लाख उत्पन्न मिळाले आहे.

## निधीअभावी काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीचे काम रखडल



अंबाजोगाई तालुक्यातील काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीसाठी ३.९४ कोटी रुपयांचा निधी नगर परिषदेने द्यावयाचा होता. परंतु अद्यापही नगर परिषदेच्या निधी उपलब्ध करून दिला नसल्याने उंचीवाढीचे काम रखडले आहे. त्यामुळे हा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून घ्यावा असे पत्र बीड पाटबंधारेच्या उपअभियंत्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने ६ सप्टेंबर २०१९ रोजी मंजूर केलेल्या शासन निर्णयानुसार, काळवटी तलावाच्या उंचीवाढीला मंजुरी मिळाली होती.

## पेठ बीड शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्षपदी जाधव तर उपाध्यक्षपदी गुंजाळ यांची निवड

बीड - सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ बीड,सिंहासनाधीश शिवजयंती उत्सव पेठ बीड संस्थापक अध्यक्ष नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ,मार्गदर्शक नगरसेवक अमर नाना नाईकवाडे व मंडळतील मार्गदर्शक -भारत तात्या मस्के बंडू भाऊ गाडे अनिल भाऊ घोलप संतोष अप्पा मोरे दिनेश मामा जोगदंड महेश नाईकवाडे,अशोक अप्पा परळकर, आणि जेष्ठ सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली सालाबाद प्रमाणे याहीवर्षी शिवजयंती अत्यंत उत्साहात साजरी होणार. आज झालेल्या



बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी -विक्की जाधव, उपाध्यक्षपदी -सुजीत गुंजाळ व सचिवपदि -नितीन घोडके यांची निवड करण्यात आलेली आहे. सदर बैठक बाळासाहेब गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या बैठकीस दत्ता जाधव, बाबू पावर, नितीन गरड, राम सवासे, संतोष जाधव, सुनिल भाऊ घोलप, सतीश तात्या नाईकवाडे,प्रेमराज गुंजाळ, उमेश कोठी, सचिन जगदाळे सुशांत सोनटक्के, आकाश चांदणे, बंटी साठे,प्रशांत सुतळे,तुकाराम भांबरे, देवीचरण गवळी दत्ता पगळ,दीपक चांदणे,अक्षय इगडे, जगदीश खडके, संदेश साठे, आकाश निर्मळ, दीपक तट, दिपक धुरंधरे, अमर चांदणे,शिवराज बामणे अक्षय चांदणे,कृष्णा सोनटक्के, कृष्णा बामणे,कृष्णा मस्के,अविनाश चांदणे, सचिन सवाशे,अभिषेक खडके, निखिल घोलप,अक्षय इगडे यांच्या सहित सिंहासनाधिस ग्रुप व मा. बाळासाहेब गुंजाळ मित्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होत

## राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत कोल्हापूरला पहिले पारितोषिक



परळी : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित २७ वी राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत कोल्हापूरच्या लोकनृत्य संघाने बाजी मारत पहिले बक्षीस पटकाविले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने २७ वी राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा शुक्रवारी पार पडली. या स्पर्धेत कोल्हापूरच्या संघाला पहिले पारितोषिक मिळाले. तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस नायगावच्या संघाने पटकाविले. या स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे बक्षीस वरळीच्या संघाला मिळाले. तर उत्तेजनार्थ पहिले बक्षीस नागपूर व उत्तेजनार्थ द्वितीय बक्षीस चिपळूण संघाने पटकाविले. विजेत्या संघांना बक्षीसाचे धनादेश, स्मृतीचिन्ह

## गेवराईच्या भूमीपुत्राचा परभणीत डंका

### कृषीभूषण महेश बेदरे यांचा उद्योग मंत्र्यांच्या हस्ते गौरव



कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून गेवराई चे नाव मराठवाडा भर कृषी प्रदर्शनामुळे महेश बेंद्रे यांच्या कल्पकता नियोजनामुळे झालेला आहे प्रदर्शनाच्या माध्यमातून मराठवाडा भर प्रत्येक जिल्ह्यात प्रदर्शन उत्कृष्टपणे आयोजन करण्याचा मानस ठेवून गेवराई चे भूमिपुत्र कृषी भूषण महेश बेदरे यांनी बीड जिल्ह्याबरोबरच परभणी येथे दिनांक १४ ते १८ फेब्रुवारी पर्यंत राज्यस्तरीय कृषी संजीवनी महोत्सवाचे आयोजन केलेले आहे काल राज्याचे उद्योग मंत्री नामदार उदय सामंत साहेब यांच्या हस्ते संजीवनी कशी महोत्सवाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले याप्रसंगी मराठवाडा भर कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना नव तंत्रज्ञान मध्ये कृषी प्रदर्शनामुळे मोठा फायदा होतो काल याच निमित्ताने राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी महेश बेंद्रे यांचा विशेष गौरव केला यावेळी प्रदर्शनाचे मुख्य संयोजक आनंद भरोसे सह आमदार राजेश विटेकर आदी मान्यवर उपस्थित होते या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्र शासन कृषी विभाग प्रकल्प संचालक आत्मा परभणी व संजीवनी मित्र मंडळ यांच्या माध्यमातून या प्रदर्शनाच्या आयोजन केलेले आहे या प्रदर्शनास परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व आपल्या शेतीमध्ये नऊ आधुनिक तंत्रज्ञान मिळावे यासाठी नक्कीच शेतकऱ्यांना फायदा होईल

## शिवजन्मोत्सवानिमित्त भगव्या ध्वजारोहणाने शिवसप्ताह स्पर्धेला प्रारंभ

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड व ३३ कक्षांच्या वतीने बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९१ व्या जयंतीनिमित्त दि.१५ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत वक्तृत्व निबंध,रांगोळी,चित्रकला तीन गटात इयत्ता पाचवी ते आठवी इयत्ता नववी ते बारावी पदवी ,पदव्युत्तर अशा गटात स्पर्धा आयोजित केली असून



प्रथम बक्षीस २००० द्वितीय बक्षीस १००० तृतीय बक्षीस ५०० रुपये याप्रमाणे असणार आहे.यावेळी स्पर्धकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी प्रा.दिपक पवार, प्रा.शिवानंद मेहत्रे,प्रा.साहेबराव शिंदे ,प्रा.व्यंकटी पावडे,इंजि. शे.रा पाटील,शिवाजी पाटील,प्रा. राधाकृष्ण होगे,नानाराव कल्याणकर,शिवाजीराव खुडे, श्री.शेळके ,अँड.सतीशकुमार जाधव,अँड.बालाजी वाघमारे,पंडितराव कदम, भास्करराव थेटे,कुलदीप कल्याणकर, शिवाजी पाटील बामणीकर, जी.टी कदम सुमित्रा पवार,कल्पना चव्हाण,सत्यभामा जाधव, वनिता देवसरकर,अंकुश कोल्हे, संगमेश्वर लांडगे उपस्थित होते.

# मनोज जरांगेंनी बावनकुळेंचं केलं तोंडभरून कौतुक, म्हणाले मी त्यांना शाबासकी देतो; नेमकं प्रकरण काय?

## सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली, या भेटीवर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला

भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली, या भेटीची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. दुसरीकडे या भेटीवर बोलताना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला आहे. धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांची जी भेट झाली त्यानंतर आता मला काहीच सूचत नाही. काय झालं, कसं झालं आणि का भेट घेतली याबद्दल मी कालपासून कन्फ्युजनमध्ये आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील? मनोज जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. गोरगरीब मराठ्यांनी ज्यांच्यावर विश्वास टाकला तोच माणूस इतका विषारी झाला. कधी स्वप्नातही वाटत नव्हतं की अशी परिस्थिती उद्भवू शकते. याउलट वेळ पडली तर पक्षाला लाथ मारायला पाहिजे होती त्यांनी. त्यामध्ये एक सांगून जातो ही गुप्त भेट होती, पण उघड झाली. जर ही भेट उघड झाली नसती तर





हा मराठ्यांशी किती मोठा धोका होता किती मोठा दगा फटका होता. जर हे उघड झालं नसतं तर काय झालं असतं? याचा मराठा समाजानं एकवेळ विचार करावा असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, हे खूप भयंकर आहे. मराठ्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला. त्यांना आपल्या स्वतःच्या घरात घेतलं आणि स्वतःच्या लेकरा प्रति मानलं. तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपलं. जर ही भेट झाली असं माहीतच झालं नसतं तर हे सगळं प्रकरण दबलं होतं. जर ही गुप्त भेटीची माहिती उघड झाली नसती तर त्यांनी मीडियासमोर भाषण केलं असतं. परंतु योगायोगाने ही गुप्त भेट उघड झाली. ज्यांनी ही भेट झाल्याची माहिती उघड पाडली त्यांना मी मार्क देतो, शाबासकी देतो. बावनकुळे साहेबांना या संदर्भात शाबासकी दिली पाहिजे, की त्यांनी हे उघड केलं असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १६ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## यांनाही सरळ कराच!

सर्वोच्च न्यायालयाने दोन अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांस हात घातला असून ते तडीस नेल्यास काही मूलभूत बदल घडू शकतील. यातील पहिला मुद्दा आहे लोकप्रतिनिधित्व कायद्याचा आणि दुसरा राज्यपालांच्या वर्तनाचा. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता त्यावर भाष्य गरजेचे. मी क्लबमधून आले, मी नशेत आहे, मद्यधुंद तरुणीचा भररस्त्यात राडा, पोलिसांशी घातला वाद; तळवशे तळीरश्र पाहून तुम्हीच सांगा चूक कोणाची? बाई म्हणजे खेळणं वाटली का?, त्याने बसमध्ये चढणाऱ्या महिलेच्या कंबरेला पकडलं अन तरवअएज पाहून व्यक्त कराल संताप भ्रष्टाचार वा अन्य गंभीर गुन्ह्याखाली एखाद्यास शिक्षा झाल्यास त्यास भविष्यात सरकारी नोकरीचे दरवाजे कायमचे बंद होतात. अशी गुन्हा सिद्ध झालेली व्यक्ती कोणत्याही सरकारी कार्यालयात साध्या शिपायाची नोकरी करण्यासही अपात्र ठरते. मात्र अशी शिक्षा झाल्यानंतर सहा वर्षांनी सदर व्यक्ती लोकप्रतिनिधी कशी काय होऊ शकते, असा कळीचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला असून या प्रकरणी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास नोटिसा बजावल्या आहेत. सर्वोच्च न्यायालय या मुद्द्याचा फडशा पाडू इच्छिते असे दिसते. याचे कारण आमच्या नोटिशींस उत्तर आले नाही तरी या प्रकरणी सुनावणी सुरू राहील असे न्यायालयाने स्पष्ट केले असून त्यासाठी ४ मार्च ही तारीख न्यायालयाने मुक्रर केली. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपंकर दत्ता आणि मनमोहन यांनी या नोटिसा बजावल्या. सर्वोच्च न्यायालयाचा हा पवित्रा पाहून विविध शासकीय यंत्रणांनी त्यात आपले म्हणणे मांडण्याची इच्छा व्यक्त केली. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय ङ्गरिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल ॲक्टफ म्हणजे लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या दोन कलमांत बदल करू पाहते असा लावला जात असून तसे झाल्यास ही मोठी घटना ठरेल. हे पहिल्यांदाच होते आहे असे नाही. याआधीही निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांस संपत्ती आणि गुन्हे यांचा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे देणे बंधनकारक करण्याचा तसेच कोणत्याही गुन्ह्यात दोन वर्षे शिक्षा झाल्यास खासदारकी/आमदारकी आपोआप रद्द होईल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानेच दिलेला आहे. याचा अर्थ लोकप्रतिनिधित्व कायद्यात याआधी दोन चांगल्या सुधारणा सर्वोच्च न्यायालयामुळेच झालेल्या आहेत. प्रत्यक्षात आल्यास ही आता तिसरी सुधारणा ठरेल. कोणताही सच्चा लोकशाहीप्रेमी या हस्तक्षेपाचे स्वागतच करेल. तथापि ते करताना आपल्या न्यायिक व्यवस्थेस अधिक निःस्पृह आणि अधिक निष्पक्ष व्हावे लागेल. असे नमूद करण्याची गरज म्हणजे सध्या विरोधी पक्षीय नेत्यांविरोधात खटल्यांवर खटले दाखल करण्याची नवी राजकीय संस्कृती. अलीकडे काही राजकीय पक्षांचे विरोधकांचा केवळ निवडणुकीय पराभव करून समाधान होत नाही. या विरोधकांस वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यातून कसे संपवता येईल याचा नुसताच विचार केला जातो असे नाही तर त्याप्रमाणे मार्ग चोखाळले जातात. दिमतीला केंद्रीय यंत्रणा आहेतच. त्यामुळे सत्ताधीशांस विरोध करणाऱ्यांस राजकीय लढाईसाठी उसंत राहात नाही आणि ते या न्यायिक लढायांतच अर्धमेले होतात. त्याचमुळे; ङ्गन्यायिक प्रक्रिया हीच आपल्याकडे मोठी शिक्षा असतेफ (प्रोसेस इज द पनिशमेंट) असे उद्गार काढण्याची वेळ साक्षात माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावर आली. अशा परिस्थितीत कोणत्या ना कोणत्या गुन्ह्यात विरोधकांस अडकवणे तितके अवघड राहात नाही. हे सर्व प्रत्यक्ष कोणा विशिष्ट राजकीय पक्षाकडून थेट होते असे नाही. पण या राजकीय पक्षाचे इतक्या संघटनांत इतके समर्थक आहेत की कोणीही उठून सत्ताधाऱ्यांस आडवे येणाऱ्यास आडवे करण्याचा हा उद्योग करू शकतो. त्यात निवडणूक आयोगाचा सरकारधर्म हा मुद्दा आहेच. एकेकाळी हिंदुत्वाच्या आधारे प्रचार केला म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार सहा वर्षांसाठी गोठवण्याचा निर्णय याच देशात घेतला गेला होता यावर विश्वास बसू नये; अशी आजची स्थिती. सर्व नियमांचा वरवंटा विरोधकांवरच फिरणार. अशा स्थितीत प्रमुख विरोधी नेते विविध आरोपांखाली दोषी ठरत गेले तर लोकशाहीच्या गळ्यालाच नख लागणार हे उघड आहे. तेव्हा आरोप सिद्ध झालेल्यांस लोकप्रतिनिधी बनता येऊ नये, हा सर्वोच्च न्यायालयाचा विचार स्तुत्य असला तरी त्याच्या अंमलबजावणीतील संभाव्य धोका दुर्लक्ष करू नये असा. तथापि राज्यपालांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेबाबत मात्र असा कोणताही धोका दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयात न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या

# शिक्षक भरती मध्ये खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनाच यापुढे खुल्या प्रवर्गातून मधून नियुक्ती मिळणार

## मुंबई हायकोर्टाच्या संभाजीनगर बेंच चा WP८६१०/२०२४ याचिकेत महत्त्वपूर्ण निकाल

शिक्षक भरती २०२२ ची भरती करत असताना शासनाने ढशीं/उींशीं मध्ये ६०% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या अभियोग्यता धारकांचाच विचार खुला प्रवर्गातून होईल याबाबत शासनाने सूचना प्रसिद्ध केली होती. दिल्ली उच्च न्यायालयाने मागास प्रवर्गासाठी सवलत मिळवून ंशिीं/उींशीं मध्ये पास होणाऱ्या उमेदवारांचा विचार खुला प्रवर्ग मध्ये करता येणार नाही असे आदेश एका प्रकरणात दिलेले होते. राज्य शासनाने काढलेल्या सूचनेमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा विचार करून शासनाने खुला प्प्रवर्गासाठी असलेली पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अभियोग्यता धारकांचाच खुला प्रवर्गामध्ये समावेश होईल असा विचार करण्यात आलेला होता. व त्यानुसारढशीं/उींशीं परीक्षा मध्ये खुला प्रवर्गातील उमेदवारांना उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली ६०% ची अट लक्षात घेऊन २५ फेब्रुवारी २०२४ रोजी शिक्षक भरती मधील पहिला टप्प्यातील याद्या तयार झाल्या.

यात राखीव प्रवर्गासाठी ५% गुणांची सवलत होती ती मिळवून ६०% पेक्षा कमी गुण मिळवून सवलतीने उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांचा खुला प्रवर्गावरील जागेवर विचार न होता केवळ राखीव प्रवर्गातील जागांसाठीच झाला.

या विरोधात शिक्षक भरती मधील काही उमेदवारांनी मुंबई हायकोर्टाच्या संभाजीनगर खंडपीठात शासनाच्या विरोधात धाव घेतली होती. परंतु न्यायालयात खुला प्रवर्गातील गुणवत्ता धारक उमेदवारांवर अन्याय होऊ नये म्हणून या याचिकामध्ये खुला प्रवर्गातील गुणवत्ता धारक शिक्षकांनी हस्तक्षेप याचिका दाखल केली होती.

या हस्तक्षेप याचिकेमध्ये गुणवत्ता धारक अभियोग्यता धारकांची अभ्यासपूर्ण बाजू वरिष्ठ वकील ॲड विजयकुमार सपकाळ यांनी न्यायालयासमोर मांडली. या याचिके मध्ये आज संभाजीनगर खंडपीठाने निकाल दिला असुन शासनाच्या विरोधात दाखल सर्व याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत.

त्यामुळे शासनाच्या भूमिकेस अनुसरून खुला प्रवर्गातील गुणवत्तावान विद्यार्थ्यांच्या वतीने हस्तक्षेप याचिका दाखल करणारे वरिष्ठ वकील ॲड. विजयकुमार सपकाळ यांनी ठाम आणि अभ्यासपूर्ण भुमिका मांडली तसेच या प्रकरणात खुला प्रवर्गातील गुणवत्तावान अभियोग्यता धारकांना न्याय मिळावा यासाठी शिवसेना प्रवक्ते संजीव भोर पाटील, अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, छत्रपती संभाजीनगर मराठा क्रांती मोर्चा समन्वयक प्रशांत इंगळे, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक प्रशांत भोसले दादा,अटल शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष जयंत आमटे सर, सामाजिक कार्यकर्ते संजय दहातोंडे सर आदींनी मोलाचे योगदान दिले. या सर्वांच्या योगदाना बद्दल खुला प्रवर्गातील गुणवत्ता धारक शिक्षकांनी या सर्वांचे आभार मानले.प्रतिक्रिया आरक्षणाची टक्केवारी ७२% झाल्यामुळे खुला प्रवर्गातील गुणवत्ता धारक मुलांवर मोठा अन्याय होत असुन अनेक भरती प्रक्रियेमध्ये खुला प्रवर्गाच्या वाटेला जागा देखील येत नाहीत. या पार्श्वभूमीवर खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता धारक उमेदवाराना या न्यायदानातून खूप मोठा आधार मिळालेला आहे. यात बाजू मांडणारे ॲड. विजयकुमार सपकाळ यांचे मनापासून आभार

जयंत आमटे
संस्थापक तथा राज्याध्यक्ष अटल शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य

ङ्गखुला प्रवर्गामध्ये बिगर मागास व राखीव प्रवर्गातील जे उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी असलेले निकष पूर्ण करतात अशा लोकांचा समावेश होतो. प्रवेश प्रक्रियेच्या मधल्या टप्प्यात मागास प्रवर्गासाठी असलेल्या सवलती घेउन पुन्हा खुला प्रवर्गातून निवड द्यावी ही मागणी मा. न्यायालयाने नाकारून गुणवत्तेचे संरक्षण केले आहे.

राजेंद्र कोंढरे
अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ

# परीक्षा पे चर्चा!

दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थीजीवनातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. या परीक्षांवर त्यांचे उज्ज्वल भविष्य अवलंबून असते. विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या अभ्यासाचा कस, कसोटी या परीक्षांतून लागते. कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या कसोटीचा हा क्षण असतो. आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून अत्यंत शांत मनाने परीक्षेला सामोरे जायचे असते. परीक्षा एक आव्हान मानून सकारात्मकतेने त्याला सामोरे जायला हवे. इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू झाल्या आहेत तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. यंदा प्रथमच बारावीची परीक्षा दहा दिवस लवकर सुरू झाली आहे. राज्यभरातून १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी राज्यातील ८१८ केंद्रांवर कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात आली आहे. यात सर्वाधिक केंद्रे छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळातील आहेत. यंदाच्या परीक्षेत गैरप्रकार घडणाऱ्या केंद्रांची परीक्षा केंद्र मान्यता पुढील वर्षापासून कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. दरवर्षी बारावीच्या परीक्षेच्या आधी प्रसारित होणाऱ्या ङ्गपरीक्षा पे चर्चाफ या कार्यक्रमाचे यंदाही दूरदर्शनवरून प्रसारण झाले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, तुमच्या वेळेवर, जीवनावर प्रभुत्व मिळवा, प्रत्येक क्षण जगा, सकारात्मक गोष्टी शोधा, फुलण्यासाठी स्वतःचे पोषण करा. या कार्यक्रमात विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ३५ विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्ञान आणि परीक्षा या दोन भिन्न गोष्टी आहेत. परीक्षा हेच सर्वस्व आणि जीवनातील अंतिम गोष्ट आहे असे मानू नये असा सल्ला पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते बंदिस्त करून ठेवू नये, त्यांना त्यांच्या आवडीच्या गोष्टी करण्याची मुभा द्यावी, पुरेशी झोप घेऊ द्यावी असा सल्ला त्यांनी पालकांना दिला. प्रेक्षकांचा गोंगाट सुरू असताना मैदानात एखादा फलंदाज तो तणाव कसा हाताळतो ती एकाग्रता शिकली पाहिजे असे सांगून विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे आणि परीक्षेचा ताण घेऊ नये असे पंतप्रधान म्हणाले. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडणे ही जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी राहील. शहरी भागात पोलिस आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांची जबाबदारी राहील. त्यानुसार कामकाज करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मंगळवारी बारावीच्या परीक्षेला प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी इंग्रजीच्या पेपरला राज्यात एकूण ४२ कॉपीबहाद्दर आढळले. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक २६ कॉपीची प्रकरणे सापडली. पुणे विभागात आठ, नाशिक विभागात तीन, नागपूरमध्ये दोन, अमरावतीत दोन तर लातूरमध्ये एक या प्रमाणे गैरमार्गाची प्रकरणे आढळली. कॉपी करण्याचा प्रकार फार जुन्या काळापासून सुरू आहे. ज्यांना अभ्यास करून पास होणे जमत नसते ते शॉर्टकट शोधत असतात. काही महाभाग तर पेपर कसा फोडता येईल यासाठी प्रयत्नशील असतात. पेपर फुटला की मग तो लाखो रुपयांना विकला जातो. इयत्ता दहावी आणि बारावी या दोन महत्त्वाच्या परीक्षेत सर्वाधिक कॉपी होते. शक्यतो कुणाला नापास करायचे नाही असे शासनाचे धोरण असले तरी त्यात पास होणे ज्यांना जमत नाही ते कॉपीचा आधार घेतात. ग्रामीण भागातील अनेक सेंटर कॉपीसाठी प्रसिद्ध आहेत. अनेकजण असे सेंटर मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतात. ङ्गबनी तो बनी, नही तो परभणीफ अशी परभणीबद्दल ख्याती आहे. कॉपी करताना तंत्रज्ञानाचा वापरही मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. एखाद्या कागदावर अपेक्षित उत्तरे लिहिली जातात. अत्यंत बारीक अक्षरात हे लिखाण असते. या कॉपीच्या झेरॉक्स काढल्या जातात. त्या काढताना मायक्रो झेरॉक्स काढल्या जातात. या कॉप्या खिशात किंवा अन्य ठिकाणी लपवून नेल्या जातात. काही बहाद्दर बाहेरून, खिडकीतून कॉप्यांचा पुरवठा करतात. यात आता एक नवीन प्रकार आला आहे, तो म्हणजे कानात ब्लूटूथ लावणे. ते कानात घातले की दिसत नाही. कॉपीबहाद्दरने कानात ब्लूटूथ घातला की, बाहेरून त्याला कोणीतरी प्रश्नांची उत्तरे देत असतो. आणि ती उत्तरे कॉपीबहाद्दर आपल्या उत्तरपत्रिकेवर लिहित असतो. परंतु आता या सर्व गोष्टींची गंभीर दखल घेतली जाणार आहे. शासनाने कॉपीचा गुन्हा आणि कायदे अत्यंत कडक केले आहेत. झेरॉक्स सेंटरवाला जर कॉपी करणाऱ्याला मदत करत असेल तर त्याच्यावरही गुन्हा दाखल केला जाणार आहे. परीक्षा केंद्रात प्रवेश देताना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य जवळ बाळगणार नाही याची खबरदारी घेतली जाणार आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे आणि व्हीडीओ कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. बारावीच्या परीक्षेत राज्यभरात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. कॉपीची प्रकरणे घडलेल्या केंद्रावरील पर्यवेक्षक व मुख्याध्यापकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यानंतरही असे प्रकार उघड झाल्यास संबंधित केंद्राची परवानगी रद्द करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. परीक्षा भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी महिनाभरापासून नियोजन करण्यात आले आहे. ङ्गसद्गुण जोपासनाफ हे शिक्षणाचे मर्म आहे तसेच ते शिक्षणाचे, जीवनाचे आणि तत्त्वज्ञानाचेही खरे ध्येय आहे. विद्यार्थ्यांनी वर्षभर जी मेहनत केली त्याचे फळ त्यांना परीक्षेतून मिळणार आहे. ज्यांनी मेहनत केलेली नाही तेच गैरमार्गाकडे धाव घेतात. विद्यार्थ्यांनी परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून खचून जाऊ नये, आयुष्यात तुम्हाला आणखी काही संधी खुणावणार आहेत याची खात्री बाळगा

# घळाटवाडीच्या चैतन्यची महसुल सहाय्यक पदी निवड

## एमपीएससी परिक्षेत मिळविले दैदिप्यमान यश

माजलगाव / प्रतिनिधी : तालुक्यातील घळाटवाडी येथील चैतन्य मंगल सर्जेराव नरसाळे या युवकाने एमपीएससी परिक्षेत यश मिळवित महसुल सहाय्यक पदास गवसणी घातली असुन त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे. शहरापासुन अवघ्या पाच किमी अंतरावर असलेल्या घळाटवाडी गावातील चैतन्य नरसाळे या युवकाने एम पीएससी परिक्षेत घवघवीत यश मिळवुन गावाचा नावलौकीक केला आहे. चैतन्यचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद शाळेत झाले तर दहावी छत्रपती शिवाजी विद्यालयात, बारावी व पदवीपर्यंतचे शिक्षण सिध्देश्वर महाविद्यालयात झाले. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापिठात शासकीय सेवेत जाण्याची असलेली ओढ आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर लोकसेवा आयोगाच्या विवीध पदव्युत्तर पदवी घेत ऑगस्ट २०२४ मध्ये सहाय्यक प्राध्यापक परिक्षा उत्तीर्ण झाला. यानंतर रावसाहेब दानवे पाटील महाविद्यालय वाकुळणी ता. बदनापुर जिल्हा जालना येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणुन काम करण्यास सुरूवात केली. हे करत असतांना अभ्यासात मात्र त्याने सातत्य ठेवले होते कारण परिक्षा चैतन्य नरसाळे देत होता. यातच लोकसेवा आयोगाच्या वतीने २०२३ मध्ये महसुल सहाय्यक पदभरतीची जाहिरात निघाली. या पदासाठी फॉर्म भरत चैतन्य याने पुर्व परिक्षेत उत्तीर्ण होत डिसेंबर २०२३ मध्ये मुख्य परिक्षेतही यश मिळविले. नुकताच दोन दिवसांपुर्वी लागलेल्या निकालात चैतन्यचे नाव आल्याने त्याने परिस्थितीवर मात करत यश मिळविले आहे. त्याच्या या यशाबद्दल सरपंच संगीता येताळ, उपसरपंच यांचेसह सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी अभिनंदन केले या यशाच्या पाठीमागे भक्कम पणे साथ देणारे जीवन नखाते सर डॉ.स्वानंद कुलकर्णी सर डॉ.कांचन कुलकर्णी मॅडम छगन दादा मेंडके,,आई भाऊ मामा यांचे खूप मोलाचे योगदान आहे तसेच गावातील मित्र मंडळीचा देखील खूप पाठिंबा असल्याच त्यांनी सांगितले..या यशाबद्दल मित्र अंशीराम शिंदे अंगद दराडे अनिल विघ्ने कृष्णा नरवडे इत्यादी नी चैतन्य चं अभिनंदन केलं..



रेणुकाई रुग्णालय मध्ये चैतन्य काम करत होता त्या वेळी त्याला पगार सोबत इतरही बाबतीत सहकार्य झालं रात्री चा डब्बा डॉ . स्वानंद कुलकर्णी व डॉ कांचन कुलकर्णी पुरवत असत

**यांचे खूप मोलाचे योगदान लाभले**

या यशाच्या पाठीमागे भक्कम पणे देणारे साथ जीवन नखाते सर डॉ.स्वानंद कुलकर्णी सर डॉ.कांचन कुलकर्णी मॅडम छगन दादा मेंडके यांचे खूप मोलाचे योगदान आहे तसेच गावातील मित्र मंडळीचा देखील खूप पाठिंबा असल्याच त्यांनी सांगितले

Psi गजानन जैवाल, Psi कृष्णा बहिर, Psi सूरज अहिर, अनशीराम शिंदे,अंगद दराडे यांचे विशेष आर्थिक सहकार्य राहिले बालू गिते यांनी इंग्रजी चे धडे दिले व दत्ता जैवाल यांनी देखील साथ दिली जनार्धन बनकर हा मागील एक वर्षापासून चैतन्य चे रूम चे भाडे भरत होता असे चैतन्य ने कार्यक्रम मध्ये बोलताना आवर्जून सांगितले

## गावातील नवं विध्यार्थी बंधू भगिनींनी आदर्श घ्यावा असा चैतन्य



घळाटवाडी गावं हे अंत्यत प्रेमळ व सुसंस्कृत गाव आहे. गावाचे भविष्य युवकांचे हातात आहे नवं विध्यार्थी बंधू भगिनींनी चैतन्य नरसाळे यांचा संघर्षा चा धडा वाचून आपलं भवितव्य उज्वल करून घ्यावे गाव शैक्षणिक दृष्टी कोनातून बदलत्या युगात पाहिजे तसं प्रगत व्हावं त्या साठी पूर्ण शिक्षण हे अंत्यत महत्वाचे आहे विध्यार्थी मित्रानो कोणतंही कारण न सांगता ठाम भूमिका घेऊन शिक्षण पूर्ण करावे चैतन्य हा अंत्यत वाईट परिस्थिती मधून पुढे आला त्याला आदर्श मानून त्याच चरित्र आत्मसाद केलं तर आपल्याला आपले संकटे त्याच्या पुढे खूप छोटे वाटतील. चैतन्य हा एक गावाच्या शैक्षणिक क्रांती चा पहिला किरण आहे त्याच्या वाटेनं चालत गेलं तर नक्कीच आपल्या गावाच नाव शैक्षणिक क्षेत्रात लोकीक होईल चैतन्य चा आदर्श गावातील प्रत्येक विध्यार्थी बंधू भगिनींनी घ्यायला हवा. **-अंगद दराडे, मित्र**

## तिसऱ्या प्रयत्नात यश मिळाले

माजलगाव व छत्रपती संभाजीनगर येथे अभ्यासिकेत सतत केलेला अभ्यास व स्वंयअध्ययनामुळे परिक्षा उत्तीर्ण करता आली. यासाठी भाउ प्रशांत, आई मंगल व मामा परमेश्वर चाळक यांनी मोठे सहकार्य केले. दोनवेळा परिक्षा दिल्या परंतु यश मिळत नव्हते परंतु निराश न होता कष्ट, अभ्यास केला आणि तिसऱ्या प्रयत्नात यश मिळाले. यापुढेही परिक्षा देणार आहे.

**- चैतन्य नरसाळे, महसुल सहाय्यक अधिकारी.**

# बैलगाडी उलटून नातवाचा मृत्यू तर आजोबा जखमी

बैलगाडी बसून शेतातून घरी परतताना समोरुन रानडुकरे गेल्याने बैल बिथरल्याने बैलगाडी उलटून नातवाचा मृत्यू तर आजोबा जखमी झाल्याची घटना पाटण सांगवी ( ता. आष्टी) येथे शुक्रवारी (दि.१४) सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जगताप वस्तीजवळ घडली आहे. आष्टी तालुक्यातील पाटण सांगवी येथील भाऊसाहेब बन्सी जगताप हे शुक्रवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास शेतातून आपले दोन नातू अन् एक नात , गवत आणि भुईमूगच्या शेंगा घेऊन बैलगाडीतून येत होती. यावेळी अजानक रानडुकरे अडवे गेल्याने बैल बिथरुन उधळले अन् यामुळे बैलगाडी उलटून यामध्ये अभिराज उर्फ बाल्या नानाभाऊ जगताप (वय १४ वर्ष) याचा जागीच मृत्यू झाला. आजोबा भाऊसाहेब जगताप हे जखमी झाले. तर इतर एक नातू अन् नात हे दोघे सुखरूप आहेत. मयत अभिराज याच्यावर रात्री उशिरा १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने पाटण सांगवी गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



# मस्साजोग राजमा चोरीप्रकरणी दोघांना अटक

बीड : धनलक्ष्मी ट्रॅडर्सच्या गोडावूनचा पत्रा कापून ८ लाखाच्या मुद्देमालाची चोरी केल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी (दि.१४) ही कारवाई केली. त्यांच्याकडून ५ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रमेश उध्दव चव्हाण (वय २७) व विनोद नाना काळे (वय २३, दोघेही रा. ढोकी ता. जि. धाराशिव) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. मस्साजोग येथील धनलक्ष्मी ट्रॅडर्स गोडाऊनचा पत्रा कापून चोरट्यांनी राजम्याचे १६५ कट्टे ज्याची किंमत ७ लाख ४५ हजार ५०० रुपये व रोख रक्कम ७५ हजार रुपये असा एकुण ८ लाख १७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला होता. ही घटना ३१ जानेवारीला घडली होती. त्यानंतर ट्रेडर्स दुकान चालक गणेश दिंगबर गायकवाड यांनी केज पोलिस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली होती. त्यानंतर याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू असताना मस्साजोग येथे चोरी केलेला राजमा पिकअपने कळबं मार्गाने अंबाजोगाई येथे घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दोघांना अटक केली. त्यांच्यातील एक साथिदाराचा अपघाती मृत्यू झाला असून उर्वरित ४ संशयितांचा शोध सुरू आहे. आरोपीतांचे ताब्यातुन ४२ पोते पावटा (राजमा) कि.अ.१,२६,०००/- रु व एक अशोक लेलँड कंपनीचा पिकअप कि.अं.४,५०,०००/- रु असा एकुण ५,७६,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नामे १) रमेश उध्दव चव्हाण वय २७ वर्षे रा. ढोकी (ता,जि.धाराशीव) यांचा पुर्व अभिलेख पाहतो पो.स्टे.बार्शी, परांडा, येथे दरोडा टाकणे व दरोडयाची तयार करणे असे गुन्हे दाखल आहेत. २) विनोंद नाना काळे वय २३ वर्षे रा. ढोकी (ता.जि.धाराशिव) यांचा पुर्व अभिलेख पाहता ढोकी पो.स्टे.ला दरोडा, घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल आहेत. दोन्ही आरोपींना व जप्त केलेला मुद्देमाल पुढील कार्यवाहीस्तव पो.स्टे.केज यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे. उर्वरित आरोपी शोध चालु आहे. पुढील तपास पो.स्टे.केज व स्था.गु.शा.बीड करीत आहेत. सदरची कामगिरी ही मा. श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपोअ बीड, मा.श्री. चेतना तिडके अंबाजोगाई व पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयसिंग जोनवाल, पोउपनि महेश विघ्ने, पोउपनि हनुमान खेडकर, पोह/ महेश जोगदंड, भागवत शेलार, राजु पठाण, तुषार गायकवाड, पोअं/ बप्पासाहेब घोडके, अश्विनकुमार सुरवसे, चालक पोह/ गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे



# आत्महत्याग्रस्त शेतक-यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी होणा-या अन्नत्याग आंदोलनात लिंबागणेशकर सहभागी होणार :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेशः- ( दि.१५ ) किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणा-या अन्नत्याग आंदोलनात दरवर्षी प्रम ाणेच यावर्षी अंबेजोगाई शहरात सामुहिक उपवास,सहवेदना ,रॅली, व्याख्यान, पुरस्कार वितरण, आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा सन्मान सोहळा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून या सर्व कार्यक्रमात शेकडो किसान पुत्रांनी सहभागी व्हावे असे आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब, संयोजक सुदर्शन रापतवार, कालिदास आपेट आदिंनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत



किसान पुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या पुढाकाराने आज दि. १५ शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालया मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, समीर शेख, रमेश गायकवाड,प्रा.नितिन घोलप, पांडुरंग वाणी,संजय घोलप, आश्रुबा गिरे, विठ्ठल कदम, रामचंद्र मुळे, विनायक मोरे, संतोष भोसले,लहु घोलप, संजय पावले,जीवन मुळे,कचरू निर्मळ आदी उपस्थित होते.

सविस्तर माहितीस्तव किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने देशभरातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते मा.अमर हबीब आणि त्यांच्या सहका-यांच्या वतीने करण्यात येते. १९ मार्च रोजी साहेबराव करपे या शेतक-याने शेतीसाठी वापरण्यात येणा-या विजेचे बिल भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून आपल्या कुटुंबासह सामूहिक आत्महत्या केली. या १९ मार्च रोजी या घटनेला ३६ वर्षे पूर्ण होतील. शेतक-यांसाठीचे जाचक ठरणारे शेतकरी विरोधी कायदे रद्द करा या मागणीसाठी आंदोलन करणा-या किसान पुत्र आंदोलनाने ८ वर्षांपूर्वी १९ मार्च या दिवशी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन ही चळवळ सुरू केली.आत्महत्या केलेल्या शेतक-यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी लिंबागणेश गावातील ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले आहे.

# बीड जिल्हा न्यायालयीन कर्मचारी, विधिज्ञ व पक्षकार यांचे करिता आरोग्य सेवा सुरु

बीड । प्रतिनिधी बीड जिल्हा न्यायालय येथे न्यायालयीन कर्मचारी, विधिज्ञ व पक्षकार यांचेकरिता जिल्हा न्यायालय बीड येथे आरोग्य सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. सदर आरोग्य केंद्रामध्ये तज्ञ डॉक्टर, नर्स व कर्मचारी यांची सुविधा जिल्हा रूग्णालयाच्या वतीने पुरविण्यात आलेली आहे. सदरील आरोग्य केंद्र हे मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.श्री.आनंद एल.यावलकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले आहे. तरी सदरील आरोग्य केंद्रामध्ये कर्मचारी, विधिज्ञ व पक्षकार यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा न्यायालयाच्या वतीने करण्यात आले आहे. सदरील आरोग्य सुविधा केंद्र हे सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेमध्ये सुटीचे दिवस वगळून चालू राहिल. सदर आरोग्य केंद्रामध्ये वैदयकीय तपासणी तसेच इतर आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या असून सदर सेवा ही संपूर्णपणे मोफत आहे.

# आष्टीच्या गटविकास अधिकारी पदाचा बागलाने यांनी स्वीकारला पदभार

आष्टी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी या पदावरून आष्टी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी गोकुळ बागलाने यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला असून त्यांचे पंचायत समिती व विविध क्षेत्रातील नागरीकांच्या वतीने स्वागत करण्यात आले.आष्टी पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी डॉ सचिन सानप यांनी विनंती वरून गटविकास अधिकारी पदाचा चार्ज काढून घ्यावा अशी विनंती केली होती त्यामुळे त्यांचा चार्ज काढून त्यांच्या जागी सहाय्यक गट विकास अधिकारी गोकुळ बागलाने यांना प्रभारी गटविकास अधिकारी पदाचा पदभार दिला आहे त्यांनी सोमवारी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला असून त्यांना समितीच्या पंचायत कार्यालयातील कामाचा चांगला अनुभव आहे. यावेळी बोलताना बागलाने म्हणाले की पंचायत समितीच्या कार्यालयातील सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी वेळेत कार्यालयात हजर राहून शासनाने दिलेल्या कामाचे पारदर्शक पद्धतीने कामे वेळेवर करावी असा सक्त सूचना गटविकास अधिकारी बागलाने यांनी कर्मचारी अधिका-यांना केल्या आहेत. त्यांनी आष्टी पंचायत समितीत सहाय्यक गटविकास अधिकारी या पदावर कामकाज केलेले आहे. अनुभवी असणारे बागलाने यांचे आष्टी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या भावी कारकिर्दीस पंचायत समितीच्या वतीने व विविध क्षेत्रातील नागरीकांनी शुभेच्छा दिल्या

# पत्रकार पिसाळ यांच्यावर प्राणघातक हल्ला; हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा

## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलिस अधीक्षक यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करणा-या आरोपीवर गंभीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातील विटा येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला आहे. पत्रकार पिसाळ यांच्या वर हल्ला करणा-या आरोपीवर गंभीर कारवाई व्हावी. या मागणीसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा. श्री. एस. एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात पोलिस स्टेशन मध्ये निवेदने दिली जात आहेत. त्याअनुषंगाने या निवेदनात असे ही म्हटले आहे की, या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे ,विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लबारूई येथे गुरूवारपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

नवगण राजुरी । प्रतिनिधी येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई येथे शिवस्वरूप संत नारायणदेव बाबा वाकीकर यांच्या कृपाशिर्वादाने आणि शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० ते दि.२७ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी १ ते ४ संगीत भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकिर्तन होणार असुन यात ह.भ.प.गुरूवर्य महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड, ह.भ.प.विक्रम महाराज सारूक, ह.भ.प.अक्षय महाराज पिंगळे रविवार दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० महाराष्ट्रातील समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), ह.भ.प.मोहन महाराज रेंगे, ह.भ.प.पांडुरंग महाराज जाधव, ह.भ.प.रामानंद महाराज भारती यांचे किर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.२७ फेब्रुवारी रोजी दुपारी ११ ते १ यावेळेत ह.भ.प.लक्ष्मण महाराज

# महाशिवरात्री च्या पार्श्वभूमीवर परळी शहरात स्वच्छता मोहीम राबवा : व्यंकटेश शिंदे

महाशिवरात्री निमित्त बारा ज्योतर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देश भरातून लाखों भाविक येत असतात. महाशिवरात्री च्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहरात परळी नगर परिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबवून पथदिवे दुरुस्त करण्यात यावेत असे आवाहन शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी केले आहे. परळी शहरात धुळीचे प्रमाण वाढल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. धूळ मुक्त परळी करण्यासाठी परळी नगर परिषदेने ठोस पाऊले उचलावीत. महाशिवरात्री निमित्त प्रभु वैद्यनाथा च्या निघणाऱ्या पालखी मार्गावर शनी मंदिर समोर आतिषबाजी करण्यात येणाऱ्या ठिकाणी अनधिकृत अतिक्रमण होत असून त्यावर नगर परिषदेने कठोर कार्यवाही करावी. तथा संपूर्ण पालखी मार्ग खड्डे मुक्त करून स्वच्छ करावा. संपूर्ण शहरात जंतुनाशक फवारणी करण्यात यावी. शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. महाशिवरात्री दरम्यान जड वाहतूक शहराच्या बाहेरून पर्यायी मार्गाने वळवावी. महाशिवरात्र सुरू होण्यापूर्वी वरील सर्व कामे पूर्ण करण्यात यावी अशी मागणी शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे यांनी प्रसिध्दी पत्रका द्वारे केली आह

# सोयाबीन खरेदीला मुदतवाढ अन् फरक अनुदान द्या खा.बजरंग सोनवणेंचे केंद्रीय कृषीमंत्री, वाणज्यि मंत्र्यांना पत्र

केज। प्रतिनिधी नोंदणीकृत खरेदी पूर्ण होण्यापूर्वीच नाफेड खरेदी केंद्रे बंद झाल्यामुळे बीड जल्हि्यातील सोयाबीन शेतकऱ्यांसमोर मोठी समस्या नर्मिाण झाली आहे. सोयाबीन खरेदी कालावधी वाढवावी आणि भावान्तर योजने अंतर्गत किमतीतील फरक अनुदान स्वरुरात सोयाबीन उत्पादक शेतक-यांना देण्यात यावे, अशा मागणीचे पत्र शेतकरीपुत्र खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय कृषीमंत्री आणि वाणज्यि मंत्री यांना दिले आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहाण व वाणज्यि मंत्री पियुष गोयल यांना दिलेल्या पत्रात म्हटले



आहे, बीड जल्हि्यात १ ऑक्टोबर २०२४ ते २५ सप्टेंबर २०२४ दरम्यान ४४,४७४ सोयाबीन शेतकऱ्यांनी नाफेडमार्फत त्यांचे उत्पादन विकण्यासाठी ऑनलाइन नोंदणी केली होती. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी ३० केंद्रांद्वारे खरेदी प्रक्रिया सुरू झाली आणि ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरू राहिली. दुर्दैवाने, या कालावधीत केवळ २०,१६९ शेतकऱ्यांना ५,१४,२०२ किं टल सोयाबीन विकता आले. आर्द्रतेचे कारणाने बरेच सोयाबीन परत पाठवण्यिात आले. खरेदी केंद्रे लवकर बंद झाल्यामुळे २३,२७५ नोंदणीकृत शेतकरी खरेदी प्रक्रियेत सहभागी होऊ शकले नाहीत. परिणामी, या शेतकऱ्यांना आता त्यांचे उत्पादन खुल्या बाजारात खूपच कमी किमतीत विकावे लागत आहे. जल्हि्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंतातुर आहे. ही परस्थिति लक्षात घेता, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सर्व नोंदणीकृत शेतकरी त्यांचे उत्पादन नाफेडला विकू शकतील, तोपर्यंत सोयाबीन खरेदीचा कालावधी वाढवा. उत्पादन खर्च आणि सध्याच्या बाजारातील परस्थिति लक्षात घेता, वक्रिी किंमत ४,८९२ प्रति किं टल वरून ६,००० प्रति क्विंटल पर्यंत वाढवण्यात यावी. ज्या शेतकऱ्यांना नाफेड मार्फत त्यांचे सोयाबीन विकता आले नाही, त्यांना भावांतर योजनेअंतर्गत भावातील फरक अनुदानस्वरुपात द्यावा, जेणेकरून त्यांचे कमी आर्थिक नुकसान होईल, विशेषतः उच्च आर्द्रता आणि प्रतिकूल हवामानाचा परिणाम लक्षात घेता अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना अत्यंत आवश्यक असलेला दिलासा मिळेल, असेही पत्रात म्हटले आहे. शेतकरी पुत्र असलेले खा.बजरंग सोनवणे हे बीड जल्हि्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

# माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला याला महत्व-ह.भ.प.महारुद्र महाराज खाडे

## होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

प्रतिनिधीं केज

दि.१५ : कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकीय क्षेत्रातील सुपरिचित व्यक्तिम त्व मधुकर खाडे महाराज हे अल्पकाळ जगले. माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला, याला अधिक महत्व आहे, असे मत अंबाजोगाई तालुक्यातील उम राई येथील शिवगड संस्थानचे संस्थापक ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री यांनी व्यक्त केले.वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फ ेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असलेले





ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री हे शुक्रवारी (दि.१४) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांची उपस्थिती होती.

महाराजांनी किर्तन सेवेसाठी संत तुकाराम महाराज यांचा देह तुझ्या पायी । ठेवूनि जालो उतराई //१|| आता माझ्या जीवा । करणे ते करी देवा ||ध्रु||बहु अपराधी । मतिमंद हीनबुद्धि ||२|| तुका म्हणे नेणे । भावभक्तीची लक्षणे ||३|| हा अभंग घेतला होता. ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे म्हणाले, मधुकर खाडे महाराज यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारणात सक्रियपणे कार्य केले. तिन्ही क्षेत्रात एकाचवेळी काम करण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. आयुष्यात प्रयत्न करणे आपल्या हातात आहे, फळाची प्राप्ती न करता कार्य करणे महत्वाचे असते. हा विचार घेऊन मधुकर महाराज खाडे यांनी निष्ठेने आयुष्यभर परमार्थ केला. संत तुकाराम महाराज यांचे विचार आचरणात आणले. माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला याला अधिक महत्व आहे. अल्पकाळ जगून खाडे महाराज यांनी सेवेत असताना देह सोडला. देवा तुझ्या पायाच्या ठिकाणी माझा देह ठेवून तुझ्या उपकारातून उतराई झालो आहे. देवा माझ्या जीवाचे आता तुला जे काही करायचे असेल ते कर, असे संत तुकाराम महाराज म्हणतात. अगदी त्यांच्या विचारांप्रमाणे सेवेत असताना मधुकर महाराज खाडे यांनी देह सोडला. त्यांचे कुस्ती, वारकरी संप्रदायातील कार्य पुढे नेणे हीच श्रद्धांजली ठरेल, असे मत ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्राम स्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## होळ येथे अर्जुन महाराज लटपटे यांचे आज किर्तन

ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे मूळचे गंगाखेड तालुक्यातील कोद्रीचे रहिवासी आणि होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव, माजी विद्यार्थी आहेत. मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन सप्ताह सुरू असून रविवारी (दि.१५) अर्जुन महाराज लटपटे यांचे किर्तन होणार आहे. कीर्तनास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संतोष देशमुखांच्या पत्नीला रमेशराव आडसकरांनी दिले नोकरीच नियुक्ती पत्र

केज । प्रतिनिधी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना आडस ता. केज येथील श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. शासनाने विशेष बाब म्हणून त्यांच्या या पद भरतीस मान्यता दिली असून संस्थेचे सचिव रमेश आडसकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश्वर चव्हाण यांनी मस्साजोग येथे जाऊन त्यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडा नंतर त्यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. अशी ग्रामस्थांची आणि विविध स्तरातून मागणी केली होती. त्या नुसार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिक्षण संस्थेतील नोकरी बंद असल्याने विशेष बाब म्हणून पद भरतीसाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देऊन देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना छत्रपती.शिक्षण संस्था आडस संचलित श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ विद्यालय आडस येथे लिपिक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांना सुरुवातीचे तीन वर्षे परिविक्षाधीन कालावधीसाठी त्यांना प्रती महिना १० हजार रु. मानधन देण्यात येणार असून त्या नंतर मूळ वेतनश्रेणी दिली जाणार आहे. शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव रमेश आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश्वर चव्हाण यांनी मस्साजोग येथे जाऊन अश्विनी देशमुख यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले. यावेळी रमेशराव आडसकर, राजेश्वर देशमुख आणि देशमुख यांच्या मातोश्री शारदाताई देशमुख, भाऊ धनंजय देशमुख, माजी उपसभापती ऋषिकेश आडसकर, केजचे उपनगराध्यक्ष पशुपतीनाथ दांगट, दिलीप गुळभिले, चिंचोली माळीचे सरपंच सुनील देशमुख, साळेगावचे सरपंच कैलास जाधव, सारणी (आ.) चे सरपंच संतोष सोनवणे, रंजित आडसकर हे उपस्थित होत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

रविवार १६ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## गाढे पिंपळगाव येथील शेतमजूराची मुले एकाचवेळी महसूल सहाय्यक म्हणून निवड

परळी वैजनाथ : तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील शेतकरी, शेतमजूराची मुले महसूल सहाय्यक म्हणून नुकतीच निवड झाली. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. गाढे पिंपळगाव येथील शेतकरी, शेतमजूर असलेले बालासाहेब भोसले यांना चार अपत्य असून दोन मुले निलेश व दोन मुली अश्विनी व निशा आहेत. बालासाहेब भोसले यांना दोन एकर शेती असून आपली शेती करत बालासाहेब व पत्नी संजिवनी दोघेही शेत मजूरी करत आपल्या मुलांना शिक्षण दिले. घरात काही कमी जास्त असले तरी मुलांना शिकवण्याचा ध्यास घेतला. चार जणांच्या शिक्षणाचा खर्च करणे जिकरीचे होत असतानाच मोठ्या मुलीचे अश्विनीचे लग्न करावे लागले. पण पुढील अपत्यांना शिक्षणासाठी कोणताही खर्च कमी पडू दिला नाही.आपल्या वडीलाचे कष्ट पाहत मुलांनीही मेहनतीने शिक्षण घेतले.यामुळे परवा लागलेल्या महसूल सहाय्यक पदाच्या निकालात निलेश व निशा एकाचवेळी उत्तीर्ण होवून लवकरच त्यांना पदे मिळणार आहेत. निलेश व निशा दोघांचेही प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत, माध्यमिक विवेकानंद विद्यालय, निशाचे उच्च माध्यमिक लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात पूर्ण झाले. तळ निलेशने लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठातून पूर्ण केले. निलेश, निशा, महेश यांना स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी बालासाहेब यांनी त्यांच्या आग्रहास्तव शिक्षणाचा खर्च झेपत नसताना लातूरला ठेवले. बेसीक कोर्स करून सेल्फस्टडी सुरू केली. निलेशने राज्य सेवा परिक्षेची पात्रता परिक्षा आता पर्यंत सहावेळा पास झाला आहे. तर चार मुख्य परिक्षेत एकते दोन मार्क्सने त्याला अपयश आले. आता आणखी दोन मुख्य परिक्षा एक ते दोन महिन्यात देणार आहे. पण निशाने पहिल्याच प्रयत्नात महसूल सहाय्यक पदासाठी यश प्राप्त केले.याबद्दल बहिण-भावाचे सर्वत्र अभिनंदन होत आह

# सुरेश धस, धनंजय मुंडे भेटीवर अजितदादांची पहिली प्रतिक्रिया!

## आज साठ दिवस झाले पण त्यातील एक व्यक्ती अजूनही सापडत नाही



भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली. धनंजय मुंडे यांच्या डोळ्याचे ऑपरेशन झाल्यानं त्यांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी सुरेश धस यांनी मुंडेंची भेट घेतल्याची माहिती समोर येत आहे. या भेटीची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विचारले असता त्यांनी जोरदार फटकेबाजी केली. त्यांनी पत्रकारांनाच सुनावलं.

नेमकं काय म्हणाले अजित पवार?

धस आणि मुंडे यांच्या भेटीबाबत प्रश्न विचारणा-या पत्रकारालाच अजित पवार यांनी सुनावलं आहे. ङतुला काय वाईट वाटतं. एक मंत्री आहेत एक आमदार आहेत. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आपल्याला सुसंस्कृतपणा शिकवला आहे, समजलं. दादा आणि मी एकमेकांच्या विरोधात होतो. पण आम्ही भेटायचो बोलायचो. आमची काय दुष्मनी नाहीये, आमची त्यावेळी विचारधारा वेगळी होती. आज आमची विचारधारा जुळलेली आहे. त्यापद्धतीनं आम्ही पुढे चाललो आहेत. त्याच्यामुळे त्यांचे पूर्वीपासूनच संबंध आहेत. समजा तुम्ही जर आजारी पडलात आणि जर तुमचे एखाद्या व्यक्तीसोबत जमत नसेल, पण तो तुमची विचारपासून करण्यासाठी आला तर त्यात काही चुकीचं आहे का? असा सवाल अजित पवार यांनी यावेळी केला.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. संतोष देशमुख यांची हत्या अत्यंत क्रूरपणे झालेली आहे. कोणालाही त्याचं वाईट वाटणारच. त्यांची पत्नी असेल दोन लहान मुलं असतील, बंधू असतील त्यांचं कुटुंब असेल. त्या सगळ्यांच्या मनामध्ये ही भावना येणं साहाजिक आहे. त्यामुळे त्यांच्या मागण्या योग्यच आहेत.

आमचा प्रयत्न आहे, की न्यायालयीन चौकशी, सीआयडी, एसआयटी यांच्याकडून या प्रकरणातील रिपोर्ट लवकरात लवकर यावेत, मुख्यमंत्री सांगतायेत मी पण सांगतोय, या प्रकरणात कोणीही दोषी असेल, त्यांची कोणाचीच गय केली जाणार नाही, ज्याच्या पर्यंत धागेदोरे पोहोचतील त्यांना कडक शासन केलं जाईल, वेळ लागतो तपासाला वेळ लागतो. आज साठ दिवस झाले पण त्यातील एक व्यक्ती अजूनही सापडत नाही, असं होत नाही पण दुर्दैवानं तो सापडत नाही, त्याला पकडण्याचे प्रयत्न सुरू आहे, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# पिण्याच्या पाण्यासाठी मनसे आक्रमक!

## तीन दिवस आड पाणी न दिल्यास नगरपालिका विरोधात बोंब मारो आंदोलन !

बीड : बीड जिल्ह्यातील पाली येथील धरण व माजलगाव येथील धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही नगरपालिकेच्या नकारत्यापणामुळे बीड शहरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती व पैसे मोजावे लागत आहे. मात्र नगरपालिकेला जाग येत नसल्याने तीन दिवस आड पाणी न सोडल्यास तसेच शहरातील कचऱ्याचा निपटारा वेळेवर न केल्यास नगरपालिका विरोधात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन करण्यात



येणार असल्याचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. बीड शहराला पाणीपुरवठा करणारे माजलगाव येथील बॅक वॉटर धरण व पाली येथील बिंदूसरा धरणात यंदा चांगला पाऊस झाल्याने मुबलक पाणी साठा उपलब्ध आहे. मात्र नगरपालिकेच्या चुकीच्या धोरणामुळे बीड शहरात तब्बल वीस ते पंचवीस दिवस पिण्याचे पाणी येत आहे. यामुळे बीड शहरातील नागरिक हैराण झाले आहेत पाणीपट्टी वेळेवर घेणारे नगरपालिका प्रशासन शहरातील नागरिकांना पाणी वेळेवर देणार आहेत. का असा सवाल उपस्थित करत शहरातील पाणीपुरवठा तीन दिवस आड सुरळीत न केल्यास बीड नगरपालिकेसमोर पाण्यासाठी बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार असल्याचे मनसेकडून सांगण्यात आले आहे. या संदर्भात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मनसेच्या वर्षा जगदाळे, सदाशिव बिडवे ,अमरजान पठाण यांनी आंदोलनाचे निवेदन दिले

# आ.संदीप क्षीरसागरांकडून बीडच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर संभाजीनगरमध्ये बैठका



बीड । प्रतिनिधी बीडच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१४) एमआयडीसी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात बैठका घेतल्या. यावेळी बीड येथील एमआयडीसीचा विकास आणि बीडच्या बायपासवरील स्लीप सर्व्हिस रोड व उड्डाणपूलांच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली. बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होण्यासाठी नवनवीन उद्योग बीडमध्ये यावे लागतील. त्यामुळे सर्वप्रथम बीड शहरात असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांचा, बीडच्या एमआयडीसीच्या विकासाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गेल्या आठवड्यातच आ.क्षीरसागर यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार्यांसमवेत बैठक घेतली होती. यानंतर आता पुन्हा छत्रपती संभाजी नगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात आ.क्षीयसागर यांनी याच विषयावर बैठकप घेऊन एमआयडीच्या वरिष्ठ अधिकार्यांसमवेत सविस्तर चर्चा केली. यासोबतच बीडच्या बाह्यवळण रस्ता म्हणजेच बायपासवर उड्डाणपूल नसल्यामुळे नियमितपणे अपघात होत होते. तसेच स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. याबाबतही आ.संदीप क्षीरसागरांनी शासन, प्रशासन आणि न्यायालयात पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला

# तक्रार करुनही पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे अधिकाऱ्यांना घाम फुटेना; सगर गेले पाटील आले फरक पडला काहीच नाही !

बीड । प्रतिनिधी बीड येथील मे. राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनी ग्रामीण भागातील रस्त्यांची वाट लावण्यासाठीच कामाचे टेंडर घेत आहे का? तब्बल नऊ कामांचे तक्रार करूनही ग्रामीण विकास रस्ते यंत्रणा विभागाला घामच फुटेना. या कार्यालयासमोर जागरण गोंधळ घालत आंदोलन करण्यात आले विभागीय स्तरावर याची तक्रार करण्यात आली पुणे येथील प्रयोगशाळेला या कामांचे पुनर लोकल करावे यासाठी ऑनलाईन तक्रार करण्यात आली मात्र राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वजनाखाली दबलेले बीडचे अधिकारी यावर कारवाई काय करणार. असा खडा सवाल उपस्थित करत यापुढे तक्रार व निवेदन देऊन चालणार नाही तर या कार्यालयासमोर गाढवांना हार घालून आंदोलन करणारा असल्याचे मनसेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे मे. राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीला चौकशी करत काळी यादीत टाकण्याची मागणी मनसेकडून करण्यात आली होती. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याशी चर्चा करत संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीला कायमचे ताळेबंद करण्याची मागणी करण्यात आली होती या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी ठोस आश्वासन देत कारवाई करण्यात असल्याचे म्हटले होते. या गोष्टीलाही पंधरा दिवसाचा कालावधी लोटून गेला अद्यापही राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीला कोणत्याच प्रकारे नोटीस दिलेली नाही. विभागीय स्तरावर विभागीय कार्यकारी अभियंता मोरे यांच्याकडे या संदर्भात तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची बीड येथील कार्यकारी अभियंता सगर यांनी कोणतेही दखल घेतली नाही कार्यकारी अभियंता सगर यांची बीड येथून बदली झाली असून त्यांच्या ठिकाणी पाटील नावाचे कार्यकारी अभियंता आले आहेत. त्यांनाही या संदरत तक्रार दिली असून तक्रारीची दखल घेत सर्व ठिकाणी आपण भेट देणार असल्याचे पाटील यांनी म्हटले होते मात्र सगर गेले पाटील आले फरक काहीच पडला नाही याप्रमाणे राजकमल कन्स्ट्रक्शनला अभय देण्याचे काम दोन्ही कार्यकारी अभियंता कडून झाले यापुढे मात्र मनसे स्टाईल आंदोलन करणार असल्याचे वर्षा जगदाळे यांनी म्हटले असून निवेदन तक्रारी खूप झाल्या आता अधिकाऱ्यांना धारेवर धरणार असून पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे मनसेच्या वर्षा जगदाळे यांनी म्हटले असून राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीवर जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत आपले आंदोलन सुरूच असणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# २ हजार १८३ विद्यार्थ्यांची आरटीई अंतर्गत इंग्रजी शाळेत प्रवेश

## १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करता येणार-मनोज जाधव

बीड । प्रतिनिधी २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळामध्ये आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सोडत सोमवारी शिक्षण आयुक्तांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे काढण्यात आली. यात जिल्ह्यातील २ हजार १८३ विद्यार्थ्यांची इंग्रजी शाळेत मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत प्रवेश निश्चित करता येणार आहेत. आरटीई प्रवेश प्रक्रियात १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत पालकांना ऑनलाईन अर्ज करण्याची मुभा देण्यात आली होती. यात जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांत २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होत्या या जागा करिता ५ हजार ७८१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. यातून आता २ हजार १८३ विद्यार्थ्यांची मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. आरटीई २५ टक्के लॉटरीद्वारे निवड झालेल्या बालकांच्या पालकांचे कागदपत्र पडताळणी करण्यासाठी तालुकास्तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात पडताळणी समिती स्थापन केल्या आहेत. पडताळणी समिती कागदपत्रांची तपासणी करूनच विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करतील. विद्यार्थ्यांच्या नावापुढे ज्या दिनांकास विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी बोलविले आहे. त्या पालकांकडून मूळ कागदपत्रे व एक छायांकित प्रत पडताळणी समितीने देऊन कागदपत्रांची पडताळणी करत आपल्या पाल्यांचे प्रवेश निश्चित करायचे आहेत. पडताळणी समितीने चोक पणे कागदपत्रांची पडताळणी करावी, पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी



खोटी, चुकीची माहिती भरून किंवा खोटे कागदपत्र तयार करून प्रवेश निश्चित करत असतील तर निवड समितीच्या निदर्शनास आल्यास खोटी चुकीची माहिती भरून दिशाभूल केल्याप्रकरणी आरटीई २५ टक्के प्रवेश नियमानुसार रद्द करण्यात यावा . २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने पद्धतीने राबविली जात असून, यात कसलाही मानवी हस्तक्षेप नाही. तेव्हा पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील, तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये, असे आवाहन शिवसंग्राम चे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे. आरटीई ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२५ - २६ या वर्षाकरिता निवड यादीतील प्रवेश पात्र बालकांच्या पालकांना त्यांच्या मोबाईलवर एसएमएस प्राप्त होतील परंतु पालकांनी फक्त एसएमएस वर अवलंबून न राहता आरटीई पोर्टल वरील अर्जाची स्थिती या टॅब वर आपला अर्ज क्रमांक लिहून लॉटरी लागली अथवा नाही याची खात्री करावी .

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com